
# महाराष्ट्र कारागृह वार्तापत्र

*माहे एप्रिल-२०१८, अंक - ५७ वा, पुणे*







## संपादकीय संदेश

"सुधारणा व पुनर्वसन" हे "कारागृह व सुधारसेवा" विभागाचे ब्रीद वाक्य सार्थ करण्यासाठी व कारागृहाची जनमानसातील प्रतिमा सुधारण्यासाठी आपण सर्वांनी कठोर परिश्रम करण्याची आवश्यकता आहे.

"सुधारसेवा" हे आपले सर्वांचे सांघिक कर्तव्य असून त्यात प्रामुख्याने बंदी सुरक्षा व कारागृह सुरक्षितता यांस प्रथम प्राधान्य असले तरी, कारागृह शेती व कारागृह उद्योग याकडे दुर्लक्ष करता येऊ शकत नाही.

कारागृहातील बंद्यांनी शेती व कारखाना उद्योग यामधील विविध व्यवसायात विशेष कौशल्य संपादन केल्यास, त्यांना सुटकेनंतर पुनर्वसनाच्या दृष्टीकोनातून रोजगार उपलब्धता अथवा स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यात मोलाची मदत होऊ शकते. त्याकरिता आपण सर्वांनी शेती व उद्योग यामध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे बंद्यांना संबंधित उद्योगात कौशल्य प्राप्त करता येऊ शकेल.

कारागृह व बंदी सुरक्षितता, कृषी व कारागृह उद्योग ह्या बाबीबाबतच्या सांघिक कर्तव्यात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने व्यवहार्य कल्पना मांडणा-या व उत्कृष्ट कर्तव्य बजावणा-या कर्मचा-यांना प्रोत्साहित करण्यासाठी वेळोवेळी बक्षीस/प्रशस्तीपत्र देण्याची गरज आहे.

कर्तव्यात प्रामाणिकपणा, पारदर्शकता व पोषक वातावरण निर्मितीसाठी आपल्या कर्मचा-यांना सतत प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

कारागृह विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना भारतरन्त्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती व बुध्दपौर्णिमेच्या हार्दीक शुभेच्छा।।

***- डॉ भूषण कुमार उपाध्याय, भा.पो.से.***



# येरवडा मध्यवर्ती कारागृह

## गळाभेट कार्यक्रम



दि.३०.०३.२०१८ रोजी श्री. यु.टी.पवार अधीक्षक येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे, यांनी कारागृहाच्या सांस्कृतीक हॉलमध्ये शिक्षा बंद्याकरीता बंद्यांच्या पाल्यांची गळाभेट कार्यक्रमाचे आयोजन डॉ.भूषणकुमार उपाध्याय, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे, यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते डॉ.भूषणकुमार उपाध्याय यांनी बंद्यांना मार्गदर्शन करताना आपल्या मुलांना चांगले शिक्षण देण्याबाबत तसेच मुलांच्या शिक्षणासाठी येणा-या अडचणीबाबत आपण अधीक्षकांना व कारागृह अधिकारी यांना विनंती अर्ज करु शकता आणि आम्ही आपल्या पाल्यांच्या शक्य तेवढया शैक्षणिक बाबतीतील अडचणी दुर करण्याचा पयत्न करु. या वेळी बंदी जनांच्या पाल्यांनी गळभेट उपक्रम सुरु केल्याबद्दल कारागृह प्रशासनाचे आभार मानले. या कार्यक्रमात बंदीजनांनी आपल्या पाल्यांना चॉकलेट्स , फरसान,बिस्कीट् आपल्या हाताने भरवत संवाद साधला. या उपक्रमाचा लाभ शिक्षा बंद्यांच्या १६ वर्षे वयाखालील १९४ पाल्यांनी लाभ घेतला .यामध्ये ९७ पुरुष बंदी व त्यांच्या १८७ पाल्यांनी घेतला तसेच ०५ महिला बंद्यांनी त्यांच्या ०७ पाल्यांची गळाभेट घेतली. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता श्री.नितीन क्षिरसागर, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, श्री.अनिल वांढेकर, श्री.डी.एच.खरात, श्री.गणेश मानकर, अति.वरिष्ठ तुरुंगाधिकारी, कारागृह अधिकारी व कर्मचारी श्री.एन.आर.शिंदे व श्री.जी.व्ही.तागड, शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

---



# तळोजा मध्यवर्ती कारागृह

## ‘सामाजिक समता सप्ताह’

तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे महाराष्ट्र शासन परिपत्रकदिनांक ०४ एप्रिल २०१८ अन्वये **‘सामाजिक समता सप्ताह**’साजरा करण्याचे आदेशानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेच्या वतीनेदिनांक १२/०४/२०१८ रोजीकारागृहारतील बंदयासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त दृकश्राव्य कार्यक्रम आयोजितकरण्यात आला होता.

सदर कार्यक्रमासाठी समतादूत श्रीमती नंदना गजभिये व श्रीमती हेमांगी तोळेकर यांनी एन.एफ.डी.सी ची निर्मीती असलेली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील प्रमुख लघुचित्रफित बंदयाना टिव्हीवर दाखविण्यात आली तसेचइतर काही प्रमुख प्रबोधनात्मक शॉर्ट फिल्मस दाखविण्यात येवून, समतादूत यांनी बंदयांच्या विचारांना चालना मिळेल, असे वैचारीक मार्गदर्शन केले.

---

## ‘प्रथमोपचार शिबिर’



महाराष्ट्र राज्य कारागृह विभाग व टाटा ट्रस्ट यांचे सामंजयस्य करारानुसार बंदी कल्याण व पुनर्वसन प्रकल्पाअंतमर्गत तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे दि. ५.०४.२०१८ ते ७.०४.२०१८ दरम्यान प्रथमोपचार प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले. प्रशिक्षणात इंडियन रेड क्रॉस सोसायटी, मुंबई यांच्यामार्फत शिक्षाधिन बंदी व कारागृह अधिकारी/कर्मचारी यांना विविध प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

एकुण २४ शिक्षाधिन बंदी यांनी ३ दिवसीय प्रशिक्षणाचा लाभ घेतला तसेच एकुण १३ कारागृह अधिकारी व कर्मचारी यांनी प्रशिक्षणात सहभाग नोंदविला. प्रशिक्षणास कारागृह अधिकारी /शिक्षक श्री. लक्ष्मण साळवे व कार्यरत सामाजिक कार्यकर्ते श्री अमर सावंत व संदीप दिघे यांचे सहकार्य लाभले.

---

# अमरावती मध्यवर्ती कारागृह

## वैद्यकिय तपासणी शिबिर

अमरावती मध्यवर्ती कारागृह व श्री. संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पीटल अमरावती यांचे सुयुक्त विद्यमाने दि. ५.०४.२०१८ रोजी कारागृहातील ब्पुरुष व महिला ंद्यांसाठी वैद्यकिय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ह्दयरोग, मधुमेह इ. आजारांच्या वैद्यकिय तपासणी करण्यात आल्या. तसेच आवश्यकतेनुसार औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. प्रस्तुत वैद्यकिय शिबिराचे आयोजन कारागृह अधीक्षक रमेश कांबळे, उपअधीक्षक श्री पेट्रस गायकवाड, वरिष्ठ तु. अ. श्री. पी.एस.भुसारे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संत अच्युत महाराज हॉस्पीटलचे डॉ कमलेश पाटील, डॉ. शितल शिरोळे, डॉ. धनश्री भामोदे, श्रीमती प्रज्ञा मनवर यांनी केले. यावेळी कारागृहातील वैद्यकिय अधिकारी डॉ श्री. राजकुमार तुरुंगाधिकारी श्री. बी.एस. संदानशीव, श्री. अमोल बागडे, मिश्रक, श्री भुषण कांबळे, शिक्षक, श्री नांदे, सुभेदार व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## येरवडा जिल्हा खुले कारागृह

### संगीत मैफिल





दि.१८.०३.२०१८ रोजी नवजीवन मंडळ, पुणे व स्वरतरंग, भोसरी,पुणे या संगीत अकादमीच्या संयुक्त विद्यमाने येरवडा खुले कारागृहात संगीत मैफिलीचा कार्यक्रम सादर करण्यात आला. गुडीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर हा कार्यक्रम खुले कारागृहातील बंदी बांधवांच्या मनोरंजनासाठी आयोजित केला होता. ‘स्वरतरंग’ चे गायक सौ.सुनिता करडे, कु.कोमल करडे, कु.अर्चिता शिंगाडे, सौ.मृणाल शिंगाडे, प्रविण वाघमारे व सौ. सुनंदा बिराजदार (गायक व निवेदन) यांनी कार्यक्रमाची सुरवात ‘सूर निरागस हो..’ या गजाननाच्या प्रार्थनेने केली. कार्यक्रमाची सांगता सौ.सुनिता करडे यांनी पं.भिमसेन जोशींच्या ‘बाजे मुरलीया बाजे’ या भजनाने केली. भावगीते, भक्तीगीते, कोळीगीते, स्त्रीशक्ती पोवाडा, लावणी, जोगवा, हिंदी गीते सादर केली. बालकलाकार अर्चिताने नाच रे मोरा, सांग सांग भोलानाथ, व जोगवा सादर केला. त्याला बंदी बांधव व अधिकारी कर्मचारी यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. बंदी बांधवांनी पुढे येऊन त्यांची कला सादर केली कोणी कविता तर कोणी हिंदी गाणी सादर केली.

नवजीवन मंडळ, पुणे या समाजसेवी संस्थेने बंदी बांधवांसाठी कारागृहात हा कार्यक्रम करुन सामाजिक बांधिलकी दाखवुन दिली.

या वेळी खुले कारागृहाचे अधीक्षक श्री.अनिल जगताप, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री.प्रदीप जगताप , इतर अधिकारी व कर्मचारी व कारागृहातील सर्व बंदीजन तसेच नवजीवन मंडळाचे अध्यक्ष श्री.सु.प.रानडे, सचिव-सौ.भारती सोमणी, संपर्क अधिकारी श्री.दलसिंग यादव व संगणक प्रशिक्षक श्री. गणेश शिंदे व सभासद उपस्थित होते.

---

## धुळे जिल्हा कारागृह

### प्रबोधनात्मक कार्यक्रम





डॉ.श्री.विठ्ठलराव जाधव (विशेष पोलीस महानिरीक्षक कारागृह,पुणे) यांच्या मार्गदर्शनाखाली समर्थ शांतीदुत परिवार नाशिक विभाग, शाखा धुळे यांच्या विद्यमाने दि.०६.०४.२०१८ रोजी बंदयांसाठी प्रेरणा व परिवर्तन कार्यशाळेचे आयोजन या कारागृहात करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या सुरूवातीस श्री.तुषार ससाणे यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावीक सादर केले. त्यानंतर प्रा.सौ.राजश्री शेलकर यांच्या शंखनादाने व ओमकार ध्वनीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रा.डॉ.सौ.व्ही.व्ही.निफाडकर यांनी विविध कथा व दृष्टांत देवून बंदयांचे मन परिवर्तनाच्या दृष्टीने व्याख्यान दिले. प्रा.शेलकर यांनी गुन्हेगारी मुक्त जीवन व योगव्दारे मनशांती कशा प्रकारे प्राप्त करावी याबाबत मार्गदर्शन केले. प्रा.डॉ.साजेदा शेख यांनी कायदे विषयक मार्गदर्शन केले तसेच सामाजीक सलोखा ठेवण्यास सांगीतले. त्यानंतर श्री.गोपाल सत्यनारायण शर्मा यांनी आपल्यातील चांगला माणुस शोधून आपला व पर्यायाने सामाजिक विकास करणे बाबत सांगीतले. कार्यक्रमाचे शेवटी अधीक्षक श्री.वैभव आगे यांनी सदर उपक्रमाचे कौतुक करुन यापुढेही कार्यक्रम आयोजीत करणेबाबत आवाहन केले.

सदर कार्यक्रमास कारागृह अधीक्षक श्री.व्ही.एस.आगे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्रीमती.डी.व्ही.आगे, तुरुंगाधिकारी श्री.एस.पी.ठाकरे,उक्त प्रमुख पाहुणे त्यांचे सोबत वनमाला वैद्य,कविता नांदेडकर,मिनाक्षी जैन,संजय सिंग तसेच कारागृहातील १०० बंदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन कारागृहातील शिक्षक श्री.एच.एस.पोतदार यांनी केले.

---

## बुलढाणा जिल्हा कारागृह

### वैद्यकिय तपासणी शिबिर

बुलढाणा जिल्हा कारागृहामध्ये धर्मादाय आयुक्त, बुलढाणा व इंडियन मेडीकल असोशिएशन, बुलढाणा यांचे संयुक्त विद्यमाने दि. ७.०४.२०१८ रोजी कारागृहातील बंद्यांसाठी कान, नाक, घसा, त्वचा रोग, नेत्ररोग, दुतरोग, अस्थ्रिोग व स्त्रीरोग इ. आजाराची वैद्यकिय तपासणी शिबिर घेण्यात आले व बंद्यांना औषधींचे नि:शुल्क वाटप करण्यात आले. कारागृहातील १२५ पुरुष व ०४ महिला बंद्यांनी सदर शिबिराचा लाभ घेतला.



# स्वास्थ्य

**डॉ भूषण कुमार उपाध्याय**
**भा.पो.से.,**

स्वास्थ्य या शब्दाचा सर्वसाधारण अर्थ आहे आजारांपासून मुक्त राहण्याची अवस्था. हा शब्द स्वस्थ या शब्दापासून बनलेला आहे. जेव्हा आपण स्वस्थ या शब्दाची उत्पत्ती पाहतो, तेव्हा असे कळून येते की हा शब्द स्व आणि स्थ या दोन शब्दांनी जोडलेला आहे. स्व म्हणजेच स्वतःमध्ये, स्थ म्हणजे स्थित राहणे हेच स्वस्थ राहणे आहे. शेवटी भारतीय परंपरेत स्वास्थ्य याचा अर्थ केवळ आजारांपासून मुक्ति एवढाच नाही तर त्याच्या वर स्थित एक समतुल्य अवस्थेचे नांव आहे.

स्वास्थ्य या शब्दाचा अनुवाद इंग्रजीमध्ये Health असा केला जातो. परंतु तो अनुवाद अपूर्ण आहे. स्वास्थ्य या शब्दाला इंग्रजीमध्ये कोणताही पर्याय नाही. हा Health शब्द Heal या शब्दापासून बनलेला आहे. अर्थात जेंव्हा आजार बरा होतो, त्या अवस्थेला Health असे म्हटले जाते. या Health शब्दाच्या उत्पत्तीच्या दृष्टिकोणातून यापेक्षा जास्त काहीही सांगीतले गेले नाही. या उलट स्वास्थ्य शब्द आजारांपासून दूर एका वेगळया अवस्थेचा बोध करतो जेंव्हा मानव स्वतःमध्ये स्थित होत जातो.

आयुर्वेदामध्ये आचार्य सुश्रुत यांनी या प्रकारे वर्णन केले आहे-
समदोषः समाग्निश्च समधातुमलक्रियाः ।
प्रसन्नात्मेन्द्रियमनाः स्वस्थ इत्यामिधीयते ।।


अर्थात ज्यांच्या शरीरात दोष, अग्नि, धातु आणि मला संबंधित क्रिया व्यवस्थित आहेत आणि ज्यांचा आत्मा, इंद्रिये आणि मन प्रसन्न आहेत, तेच स्वस्थ आहेत.

स्वास्थ्य संबंधात व्याख्या ही सर्वसमावेशक आहे. यामध्ये शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक या तीन प्रकारच्या स्वास्थ्याचे वर्णन केलेले आहे. शरीर आजारमुक्त व्हावे, मन प्रसन्न असावे आणि चेतनेमध्ये त्या अनंत आणि विराट पासून एक होण्याची अवस्था हेच खरे स्वास्थ्य आहे.

या प्रकारचे स्वास्थ्य मिळविणे हेच मानव जीवनाचे ध्येय आहे. नियंत्रित जेवन आणि नियमित व्यायाम मानवाला आजारमुक्त करतात. धारणा आणि ध्यान मनाच्या प्रसन्नतेस निर्माण करतात. ध्यानाची ही अवस्था जेंव्हा अत्यंत खोल होत जाते तेंव्हा मानवाला चेतनेमध्ये निर्व्दन्व्द आणि अखंडतेची अनुभूती होत जाते आणि त्याला हा अनुभव होत जातो की त्याच्यामध्ये सर्व आहे आणि सर्वांमध्ये तो सामावला आहे. अध्यात्मवाद्यांचे असे मानने आहे की मानवाचा स्व म्हणजेच त्याचे मूळ स्वरुप आनंद आणि चैतन्यरुप आहे. त्यामध्ये पूर्णपणे सामाऊन जाणे हेच स्वस्थ होणे आहे. संत आणि योगी हे याच श्रेणीत येतात. ज्ञान, भक्ति आणि कर्म यांच्या कठोर उपासने नंतरच त्यांना आपल्या स्वरुपाचे दर्शन होते आणि त्यांना सर्वोच्च स्वास्थ्य प्राप्त होते.

---




---

*मा. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे मान्यतेने प्रकाशित*
*निर्मिती :- श्रीमती रजनी कलश मोटके, शिक्षिका*
*अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षणालय, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१*

## *नागपूर मध्यवर्ती कारागृह*

रोटरी क्लब ऑफ नागपूर, नॉर्थ, या संस्थेच्या वतीन नागपूर मध्यवर्ती कारागृहातील सिध्ददोष व न्यायधिन बंद्यांकरीता दि. २२.०२.२०१८ ते ६.०३२०१८ या कालावधीत ध्यान, स्टेस मॅनेजमेंट तसेच बंद्यांचे समुपदेशन यावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेत श्री. नकुल अग्रवाल (माईंड एक्सपर्ट), यांनी बंद्यांना ताणतणाव मुक्ती या बाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेत श्री नकुल अग्रवाल यांनी रागावर नियंत्रण कसे मिळवावे, रागामुळे शरीरावर होणारे दुष्परिणाम, रागामुळे येणारा मानसिक तणाव उयाबाबत मार्गदर्शन केले. तसेच सदर कार्यशाळेत ध्यानधारणा व विविध विषयावर बंद्यांचे समुपदेशन केले.

सदरचे कार्यक्रमास कारागृह अधीक्षक श्रीमती राणी भोसले, वरिष्ठ तुरूंबाधिकारी श्री अविनाश गावित, तुरुंगाधिकारी श्रेणी-१ श्री कमलाकर मिराशे, तुरुंगाधिकारी श्रेणी-२ श्री जितेंद्र काळे व श्री उमेश नाईक तचे शिक्षक श्री योगेश पाटील व श्री संजीव ळअवादे उर्पस्थित होते. र संस्थेच्या वतीने श्री पवन खोडे व श्री नागेश राघोर्ते उर्पस्थित होते.